# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक ३१.०७.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ३०/०७/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९४ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ६७,८००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.३०/०७/२०२२ रोजी दारूबंदी कायदयाअंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन सेनगाव ०४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांकडुन १४.६७ लिटर दारू असा एकुण १००३०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळवणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि. ३०/०७/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे आ.बाळापुर येथे ०१ तसेच पोस्टे सेनगाव येथे ०१ अशा एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी रू. असा एकुण ११,३७०/—रू माल जप्त करण्यात आला असुनआरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपासकरण्यात येत आहे.

**अपघात :—** दिनांक ३०/०७/२०२२ रोजी फिर्यादी सय्यद मिनहज मुस्तफा व्य. चालक रा.रविवार पेठ अंबाजोगाई यांचे फिर्यादी वरून पोस्टे आ.बाळापुर येथे कलम २७९,३३७,४२७ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२९.०७.२२ रोजी चे ०६:०० वा चे सुमारास डोगरकडा पुला जवळ ट्रकचालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगात व हलगर्जीपने चालवुन फिर्यादीचे पिकअपला समोरून धडक देवुन फिर्यादीस व क्लिनर ला जख्मी करून पिकपचे नुसान केले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात आ.बाळापुर पोलीस तपास करित आहेत.